**श्री किसनलाल नथमल गोयनका कला व वाणिज्य महाविद्यालय,**

**कारंजा (लाड), जि.वाशिम**

**(वाणिज्य विभाग)**

**वार्षिक अहवाल (२०२०—२०२१)**

**वार्षिक अहवाल (२०२१—२०२२)**

सत्र २०२०—२०२१मध्ये बी.कॉम.भाग— १ला वाणिज्य शाखेत ६७विद्यार्थ्यांना प्रवेश समितीच्या समन्वयक डॉ.बलजित कौर ओबेरॉय यांच्या मार्गदर्शनाखाली गुणवत्तेनुसार प्रवेश देण्यात आला. तसेच बी.कॉम.भाग—२ मध्ये ६९ व बी.कॉम.भाग—३ मध्ये ६७ अशा एकुण २०३ विद्यार्थ्यांनी वाणिज्य शाखेत पद्वीस्तरावर प्रवेश घेतला.

दिनांक १७ मार्च २०२० पासून कोविड महामारीमुळे महाराष्ट्र शासनाने लॉकडाऊन घोषीत केल्यामुळे परंपरांगत प्रत्यक्ष शैक्षणिक कार्य व विविध महाविद्यालयीन उपक्रम होऊ शकले नाही. त्यामुळे ऑनलाईन पध्दतीने विद्यार्थ्यांच्या तासिका व इतर शैक्षणिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

**(२०२१—२०२२)**

सत्र २०२१—२२मध्ये बी.कॉम. भाग— १ला वाणिज्य शाखेत ७८विद्यार्थ्यांना प्रवेश समितीचे समन्वयक डॉ. दिनेश रघूवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली प्रवेश देण्यात आला. तसेच बी.कॉम.भाग—२ मध्ये ५४ विद्यार्थी व बी.कॉम.भाग—३ मध्ये ५७ अशा एकुण १८९ विद्यार्थ्यांनी पद्वीस्तरावर प्रवेश घेतला.

वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. दिनेश रघुवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली सत्र २०२१—२२ चे वाणिज्य विभागासाठी वार्षिक नियोजन करण्यात आले. त्यामध्ये वाणिज्य अभ्यास मंडळाची स्थापना, वाणिज्य अभ्यास मंडळाचे उद्घाटन, शैक्षणिक व औद्योगिक सहलीचे आयोजन, घटक चाचणी परीक्षा असाईनमेंट व संगणक प्रात्यक्षिक परिक्षा, बॅंक व्हिजीट, गेस्ट लेक्चर, Certificate Course (Accounting with Tally) इत्यादीचे आयोजन करण्यासंदर्भात चर्चा करण्यात आली.

दिनांक ०४/०५/२०२२ रोजी वाणिज्य विभाग प्रमुख डॉ.दिनेश रघुवंशी प्रा.घननिळ गजभिये आणि डॉ. बलजित कौर ओबेरॉय यांच्या उपस्थितीत वाणिज्य अभ्यास मंडळाची सत्र २०२१—२२ करिता कार्यकारिणीची निवड करण्यासाठी सभा घेण्यात आली.

यामध्ये खालील कार्यकारिणी सर्वानुमते गठित करण्यात आली.

१) अध्यक्ष — सौरभ बबन सावके (वाणिज्य भाग—३)

२) उपाध्यक्ष — कु. पुजा मनोहर वाघ (वाणिज्य भाग—२)

३) सचिव — कु. वैशाली राजेन्द्र तिडके (वाणिज्य भाग—१)

४) सहसचिव — प्रतिक राजेश जयस्वाल (वाणिज्य भाग—१)

५) सदस्य — कु. रेशमा मनोहर वाघ (वाणिज्य भाग—१)

६) सदस्य — कु. साक्षी विलास देशमुख (वाणिज्य भाग—१)

७) सदस्य — कन्हैया लक्ष्मण राठोड (वाणिज्य भाग—१)

८) सदस्य — कु. मयुरी विनोद देशमुख (वाणिज्य भाग—१)

९) सदस्य — निखिल बाळु राठोड (वाणिज्य भाग—१)

वाणिज्य विभागा अंतर्गत विद्यार्थ्यांना कौशल्य विकासाची सुवर्ण संधी प्राप्त व्हावी या हेतूने दिनांक १ डिसेंबर २०२१ ते ४ जानेवारी २०२२ या ३० दिवसाच्या कालावधीत "Accounting with Tally Certificate Course" या प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे आयोजन करण्यात आले. या अभ्यासक्रमाचे समन्वयक प्रा. घननिळ गजभिये होते तर प्रमुख मार्गदर्शक म्हणुन डॉ. बलजित कौर ओबेरॉय यांनी विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले.

या सर्टीफिकेट कोर्समुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तमत्व विकासाला चालना मिळुन त्यांच्या मध्ये Software वापरण्याचे कौशल्य प्राप्त झाल्यामुळे त्यांना Tally Data Entry Operator म्हणुन रोजगाराच्या संधी प्राप्त करता येतील असे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विनय कोडापे यांनी सांगीतले.

दिनांक ०७ मे २०२२ रोजी वाणिज्य फोरमच्या विद्यार्थ्यांची अमरावती येथील HIDC या विविध आस्थापनांना भेट देण्यात आली. यामध्ये वाणिज्य शाखेतील ६० विद्यार्थ्यांचा समावेश होता.

दिनांक १२/०५/२०२२ रोजी वाणिज्य भाग—३च्या Insurance या विषयाच्या संदर्भात श्री प्रतिक ठाकरे (Development Officer LIC) यांचे Course Lecture आयोजित करण्यात आले होते.

दिनांक १७/०५/२०२२रोजी ''पदवीनंतर रोजगाराच्या संधी'' या विषयावर RD Institute of Account and Taxation, पुणे येथील चार्टड अकांऊन्टर श्री राजेश डांगी यांचे व्याख्यान वाणिज्य फोरम तर्फे आयोजित करण्यात आले होते.

दिनांक २१/०५/२०२२ रोजी ''नविन परीक्षा पध्दती'' बाबत महाविद्यालयातील परीक्षा नियंत्रक डॉ. सुनिल राठोड यांनी एक दिवशीय कार्यशाळेला मार्गदर्शन केले.

दिनांक २५/०५/२०२२ रोजी वाणिज्य भाग—३च्या विद्यार्थ्यांकरिता वाणिज्य भाग—२ तर्फे ''Farewell Program'' वाणिज्य फोरम तर्फे आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला वाणिज्य भाग—३ चे सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

**विभाग प्रमुख**

**(डॉ.दिनेश रघुवंशी)**

# Photos of Programme











**News of Programme**

**महाराष्ट्र उद्योजकता विकास केंन्द्र (एम.सी.ई.डी) आणि श्री.किसनलाल नथमल गोयनका कला व वाणिज्य महाविद्यालय, कारंजा (लाड) यांच्या संयुक्त विद्यमानाने एकात्मीक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, अकोला द्वारा पारधी विकास कार्यक्रम अंतर्गत पारधी महिला बचत गटांकरिता 'अगरबत्ती बनविणे प्रशिक्षण कार्यक्रम' श्री.कि.न.गो.महाविद्यालयात संम्पन्न.**

दि. ०४/०७/२०२१ ते १३/०७/२०२१ या कालावधीत पारधी विकास कार्यक्रम अंतर्गत पारधी विकास कार्यक्रम अंतर्गत पारधी आदिवासी महिला बचत गटांकरिता अगरबत्ती बनविणे प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

महाराष्ट्र उद्योजकता विकास केंन्द्र आणि एकात्मीक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय अकोला यांच्या द्वारे प्रशिक्षणाकरिता पारधी समाजातील तीन बचत गटांची निवड करण्यात आली. यामध्ये शिल्पकार महिला बचत गट — काकडशिवणी, जय बजरंग महिला बचत गट — शिंगणापुर व बिरसामुंडा महिला बचत गट — शिंगणापुर. याप्रमाणे प्रत्येक बचत गटाचे १० सदस्य असे एकूण ३० महिला प्रशिक्षणार्थी यांची अगरबत्ती बनविणे प्रशिक्षण कार्यक्रमाकरिता निवड करण्यात आली.

या प्रशिक्षणाचे उद्घाटन महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ.विनय कोडापे यांनी केले. या कार्यक्रमाला प्रकल्प अधिकारी धम्मपाल खंडारे, अंर्तनाद इंडस्ट्रीज प्रा.लि.अकोल्याचे श्री.कैलास सातपैसे, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ.दिनेश रघुवंशी व महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद व प्रशासकीय कर्मचारी तसेच प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

याप्रसंगी डॉ.विनायक कोडापे यांनी सांगितले की हे प्रशिक्षण बचत गटासाठी अतिशय उपयुक्त असून त्यातुन बचत गटातील ३० महिलांना रोजगार उपलब्ध होणार आहे. यापूढेही असेच प्रशिक्षण समाजातील दूर्बल घटकासाठी आयोजीत करण्यात यावे अशी आशा व्यक्त केली.

अंर्तनाद इंडस्ट्रीज प्रा.लि. अकोल्याचे मॅनेजींग डायरेक्टर श्री.कैलास एस. सातपैसे यांनी प्रशिक्षणार्थींचा अगरबत्ती बनविणे प्रशिक्षण कार्यक्रमाची संपूर्ण माहिती देवुन या प्रशिक्षणानंतर प्रत्येक महिला दिवसाला ४०० ते ५०० रु रोजगार प्राप्त करु शकेल व इतरांनाही रोजगार उपलब्ध करुन देवू शकेल त्यामुळे सर्वांनी या प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा असे आवाहन केले.

प्रकल्प अधिकारी श्री.धम्मपाल खंडारे यांनी सांगितले की, एकात्मीक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय अकोला यांच्या माध्यमातुन प्रत्येक बचत गटाला तीन मशीन्स देण्यात येणार